# वेदांता लिमिटेड
# कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरण

| | |
|---|---|
| **दस्तऐवजाचे शीर्षक** | कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरण (सी.एस.आर पॉलिसी) |
| **कंपनी** | वेदांता लिमिटेड |
| **यांनी शिफारस केली आहे** | सी.एस.आर समिती |
| **यांनी मंजूर केले आहे** | संचालक मंडळ |
| **प्रभावी दिनांक** | 08 नोव्हेंबर 2024 |

## अनुक्रमणिका


| अ. क्र | तपशील |
|---|---|
| १ | धोरणाचे उद्दिष्ट |
| २ | वेदांताचे सी.एस.आर तत्त्वज्ञान |
| ३ | विषयनिष्ठ लक्ष केंद्रित करण्याची (थीमॅटिक फोकस) क्षेत्रे |
| ४ | प्रकल्प निवडण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे |
| ५ | प्रशासन - वार्षिक कृती योजनेचा आढावा घेणे, त्याची देखरेख यंत्रणा आणि तो तयार करणे |
| ६ | प्रकल्पांच्या / कार्यक्रमांच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे |
| ७ | लेखापरीक्षा (ऑडिट) |
| ८ | संसुचना |
| ९ | जबाबदारी |
| १० | धोरणाचा आढावा घेणे |
| ११ | कायद्यात सुधारणा करणे |
| १२ | परिशिष्ट – वेदांता लिमिटेड मधील सी.एस.आर उपक्रम |

# वेदांता लिमिटेड
# कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरण

## ए. धोरणाचे उद्दिष्ट

वेदांता लिमिटेड ('व्ही.इ.डी.एल' किंवा 'कंपनी') ने भारत विकास ध्येये आणि यू.एन शाश्वत विकास ध्येये यांच्या अनुषंगाने आपला व्यवसाय सामाजिकदृष्ट्या जबाबदार, नैतिक आणि पर्यावरणपूरक पद्धतीने चालविण्याची व तिच्या कार्यक्षेत्रात आणि कार्यक्षेत्राच्या आसपासच्या आणि त्यापलीकडे समुदायांचे जीवनमान सुधारण्यासाठी सतत काम करण्याची बांधिलकी स्वीकारली आहे. हे धोरण वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मार्गदर्शन प्रदान करते आणि हे सुनिश्चित करते की कंपनी सुसंगत व अनुपालन तत्त्वावर कार्य करत आहे.

## बी. वेदांताचे सी.एस. आर तत्त्वज्ञान

वेदांता लिमिटेड येथे आमचा आमच्या आसपासच्या समुदायांच्या आणि एकूणच देशाच्या सामाजिक भल्यासाठी नव्याने गुंतवणूक करण्याचा सुस्थापित इतिहास आणि बांधिलकी आहे.

### सी.एस.आर ची परिकल्पना

*"शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाद्वारे समुदायांना सबल करणे, आयुष्यात कायापालट करणे आणि राष्ट्र उभारणीस मदत करणे."*

आम्ही असे मानतो की,

- आम्ही देशाचा संकलित व सर्वसमावेशक विकास घडवून आणण्याला सकारात्मक पद्धतीने प्रभावित करतो व त्यात भर घालतो, आणि हे राष्ट्रीय व राज्य सरकार तसेच स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय भागीदारांच्या सहभागाने साध्य केले जात आहे;
- आमच्या भागधारकांशी, विशेषत: ज्या समुदायांबरोबर आम्ही काम करतो त्यांच्याशी, शाश्वत, दीर्घकालीन आणि परस्पर फायदेशीर संबंधांवर आमच्या व्यवसायांचा शाश्वत विकास अवलंबून आहे;
- सरकारने कॉर्पोरेट आणि नागरी समाज / समुदाय यांच्यावर आधारित संस्थांशी भागीदारी करण्यापलीकडे, शाश्वत उपाय तयार करण्याच्या दिशेने आमचे प्रयत्न, संसाधने एकत्रित करण्यासाठी एक मजबूत गुणक आम्ही उपलब्ध करून देत आहोत;
- आमचे कर्मचारी आमच्या व्यवसायासोबतच मजबूत समुदाय तयार करण्यासाठी सुद्धा भर घालण्याची क्षमता ठेवतात.

## सी. विषयनिष्ठ लक्ष केंद्रित करण्याची (थीमॅटिक फोकस) क्षेत्रे

आमच्या कार्यक्रमांचा दारिद्य निर्मूलनावर, विशेषत: संकलित विकासावर भर असतो, जे आधारभूत आणि आवश्यकता मूल्यांकन, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विकास कार्यसूचींच्या (अजेंड्यांच्या) अनुषंगाने एकूण सामाजिक-आर्थिक विकास आणि लोकांना सबल करण्यावर परिणाम करते.
प्रमुख जोर देण्याची क्षेत्रे खाली दिली आहेत:

**ए.** मुलांचे कल्याण आणि शिक्षण
**बी**. महिला सबलीकरण
**सी.** आरोग्य सेवा
**डी.** पाणी व स्वच्छता
**इ.** शाश्वत शेती व पशुकल्याण
**एफ.** कौशल्य विकास उपक्रमांद्वारे युवकांसाठी बाजारपेठेशी निगडित कौशल्य
**जी.** पर्यावरण संरक्षण आणि पुनःस्थापना
**एच.** क्रीडा आणि संस्कृती
**आय**. सामुदायिक पायाभूत सुविधांचा विकास
**जे**. राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग ज्यात आपत्ती निवारण, बचाव, मदत आणि पुनर्वसन यांचा समावेश आहे परंतु तेवढ्यापुरते मर्यादित नाही

सी.एस.आर उपक्रम (परिशिष्ट - सी.एस.आर उपक्रमांसाठी मुख्य क्षेत्रे) हे कंपनी अधिनियम, 2013 च्या अनुसूची VII मधील उल्लेखित उपक्रमांशी सुसंगत आहेत. लक्ष केंद्रित करण्याची क्षेत्रे वेळोवेळी बदलली जाऊ शकतात आणि हे सी.एस.आर समिती आणि कंपनीच्या संचालक मंडळाच्या शिफारशींनुसार केले जाते.

## डी. प्रकल्प निवडण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे

सी.एस.आर प्रकल्प हे स्वतंत्र एजंसीने दर तीन वर्षांनी केलेल्या आवश्यकता मूल्यांकन व आधारभूत सर्वेक्षण अहवालाच्या शिफारशींवर आधारित असतील.

वेदांता येथे आम्ही सी.एस.आर कार्यक्रम देण्यासाठी खालील अंमलबजावणी मॉडेल्स विचारात घेणार आहोत.

- **भागीदारी:** कलम 8 कंपन्या / नागरी समाज / एन.जी.ओ संस्था ज्यात बहुपक्षीय आणि आंतरराष्ट्रीय एजंसी, शैक्षणिक आणि प्रशिक्षण संस्था, कॉर्पोरेट्स, सरकार आणि समुदायाच्या नेतृत्वाखालील संस्था यांच्यासोबत तृतीय पक्षांशी भागीदारी तयार करणे.
- **प्रत्यक्ष सहभाग:** वेदांताद्वारे आणि / किंवा या हेतूसाठी स्थापन केलेल्या फाउंडेशनद्वारे कंपनीच्या आतच (इन-हाऊस) अंमलबजावणी करणे ज्यात प्रकल्पाचे डिझाइन आणि वितरण सामील आहे.

वार्षिक कृतीची योजना अशा प्रकल्पावर आधारित असेल जे गरज मूल्यांकनाच्या आणि आधारभूत सर्वेक्षण अहवालाच्या आधारे निवडले गेले असेल. सी.एस.आर समिती ही सी.एस.आर उपक्रमांवर निर्णय घेईल आणि सी.एस.आर वार्षिक कृतीची योजना मंजूर करण्यासाठी मंडळाकडे शिफारस करेल.

## इ. प्रशासन - वार्षिक कृती योजनेचा आढावा घेणे, त्याची देखरेख यंत्रणा आणि तो तयार करणे

वेदांताच्या तांत्रिक मानकांशी आम्ही आमच्या प्रक्रियांना प्रकल्पाच्या जीवनचक्रात अनुरूप करत असतो. बहुस्तरीय प्रशासन यंत्रणेमुळे संघांना प्रकल्पांचे बारकाईने मूल्यांकन करता येते आणि गरज असेल तिथे आवश्यक अभ्यासक्रमात सुधारणा करता येतात. यात खालील गोष्टी सामील आहेत:

- सी.एस.आर संघ वेळोवेळी अंतर्गत आढावा घेत असतात ज्यात विशिष्ट प्रकल्पांना मंजुरी देणे, भागीदारांचे ऑनबोर्डिंग, अंदाजपत्रके (बजेट्स), लेखापरीक्षण अहवाल आणि त्यांचे अनुपालन यांच्यावर देखरेख, सी.एस.आर प्रक्रिया आणि त्यांच्या परिणामांचा आढावा घेणे सामील आहे.
- सी.एस.आर एक्सको आणि मॅनकॉम वार्षिक सी.एस.आर योजना आणि अंदाजपत्रक मंजूर करतील आणि दर तिमाहीतून एकदा कार्यक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेतील.
- वार्षिक सी.एस. आर योजना / अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी कंपनीची सी.एस.आर समिती वर्षातून दोनदा बैठक घेऊन मंडळाच्या धोरणानुसार सी.एस.आर उपक्रम सुरू असल्याची खात्री करून घेईल आणि प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेईल.

मंडळाने स्वत:चे समाधान करून घ्यावे की अशा प्रकारे वितरीत केलेला निधी या कामांसाठी वापरण्यात आला आहे आणि अशा प्रकारे वितरीत केलेल्या निधीचा वापर त्याने मंजूर केलेल्या पद्धतीने करण्यात आला आहे आणि सी.एफ.ओ किंवा वित्तीय व्यवस्थापनासाठी जबाबदार व्यक्ती या संदर्भात प्रमाणित करेल.

कंपनीच्या सी.एस. आर उपक्रमांमुळे, जर काही, अतिरिक्त रक्कम निर्माण झालीच, तर ती कंपनीच्या व्यावसायिक नफ्याचा भाग ठरणार नाही आणि कोणतीही खर्च न केलेली रक्कम (सदर आर्थिक वर्षांतील अतिरिक्त खर्चासाठी वापरल्यानंतर) चालू असलेल्या / चालू नसलेल्या प्रकल्पात वर्गीकृत केली जाईल आणि कायद्याच्या आवश्यकतेनुसार एस्क्रो / फंड मध्ये जमा केली जाईल.

याव्यतिरिक्त, कंपनीने 2% दायित्वाच्या पलीकडे जाऊन कोणतीही रक्कम खर्च केली की कंपनी अतिरिक्त रक्कम पुढे नेऊ शकते (कॅरी फॉरवर्ड करू शकते) आणि कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 135 (5) अंतर्गत खर्च करण्याच्या आवश्यकतेविरूद्ध रक्कम तत्काळ पुढील 3 आर्थिक वर्षांपर्यंत सेट ऑफ करू शकते.

## एफ. प्रकल्पांच्या / कार्यक्रमांच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे

कंपनी जिथे लागू असेल तिथे कंपनी अधिनियम, 2013 अंतर्गत खालील आवश्यकतेनुसार प्रभावाचे मूल्यांकन करेल: *कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 135 (5) च्या अनुषंगाने, तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांत, सरासरी ₹. 10 कोटी किंवा त्यापेक्षा जास्त सी.एस.आर दायित्व असलेल्या प्रत्येक कंपनीने, एखाद्या स्वतंत्र एजंसीमार्फत रु. 1 कोटी किंवा त्यापेक्षा जास्त खर्च असलेल्या आणि प्रभावाचा अभ्यास करण्याचे हाती घेण्याआधी कमीत कमी 1 वषपिक्षा जास्त कालावधीत पूर्ण झालेल्या त्यांच्या सी.एस.आर प्रकल्पांच्या प्रभावाचे मूल्यांकन करावे.*

याव्यतिरिक्त, कंपनी दर 3 वर्षांनी एकदा इतर प्रकल्पांचे वेळोवेळी प्रभावाचे मूल्यांकन करेल.

## जी. लेखापरीक्षा

सर्व सी.एस. आर उपक्रम आणि त्यावर केलेला खर्च बाह्य स्वतंत्र एजंसी / संस्थेद्वारे लेखापरीक्षेच्या अधीन असेल.

कंपनीची सी.एस. आर समिती कंपनी अधिनियम, 2013 अंतर्गत लागू तरतुदींची आवश्यकतेचा आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांसह त्यामधील सुधारणांच्या अनुपालनाचा आढावा घेईल.

## एच. संसुचना

आम्ही स्वेच्छेने आमच्या सामाजिक कार्यक्रमांचे परिणाम वेळोवेळी आमच्या भागधारकांना कळवू.

## आय. जबाबदारी

सी.एस.आर संघासोबत कंपनीची संचालक मंडळाने स्थापन केलेली सी.एस.आर समिती कंपनीच्या सी.एस.आर धोरणासंदर्भात निर्णय घेण्यासाठी जबाबदार असेल.

## जे. धोरणाचा आढावा घेणे

सी.एस.आर धोरणाचा दर तीन वर्षांनी किंवा कंपनीच्या सी.एस.आर समितीने शिफारस केल्यानुसार आढावा घेतला जाईल.

## के. कायद्यात सुधारणा

कंपनी अधिनियम, 2013 मध्ये आणि/किंवा या संदर्भातील इतर लागू कायद्यांमध्ये पुढील कोणत्याही सुधारणा/फेरबदल या धोरणाला आपोआप लागू होतील.

# परिशिष्ट – वेदांता लिमिटेड मधील सी.एस.आर उपक्रमांसाठी प्रमुख क्षेत्रे

## विषयनिष्ठ क्षेत्रे आणि प्रकल्प यादी

### १. मुलांचे कल्याण आणि शिक्षण

- पूर्व बाल्यावस्थेसाठी नंद घर, बालसंगोपन प्रकल्प आणि तत्सम कार्यक्रम ज्यात नंद घर अंतर्गत आदर्श अंगणवाड्या स्थापन करणे सामील आहे.
- शिक्षण सांभाळ, शाळा प्रवेश मोहोत्सव, मो शाळा, प्रकल्प उज्ज्वल, प्रेरणा, फॅकोर साथी शिक्षा अमृत परियोजना, कंपनीने चालविलेल्या शाळा आणि इतर शैक्षणिक उपक्रम ज्यात समुदायांतील राखून ठेवलेल्या शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य सामील आहे.
- उंची उडान, उत्कर्ष शिष्यवृत्ती आणि तत्सम उपक्रम जेणेकरून अभियांत्रिकी, वैद्यक शास्त्र इत्यादी उच्च शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना तयार करता येईल.
- वेदांता संगणक साक्षरता कार्यक्रम, आणि तत्सम आयसीटी उपक्रम जेणेकरून पूर्व-व्यावसायिक प्रशिक्षण आणि युवांना संगणक आणि तंत्रज्ञानाची ओळख करून देता येईल.

### २. समुदाय पुढे नेणे / सुसज्ज करणे (कम्युनिटी इन्फ्रा/ मोबिलायझेशन)

- ग्राम निर्माण, ग्रामविकास केंद्र यासारखे आदर्श ग्रामविकास प्रकल्प आणि सामुदायिक मालमत्ता निर्मितीसाठी तत्सम ग्रामीण विकास प्रकल्प जसे रस्ते, पूल, नाला, गटारे, ग्रामीण विद्युतीकरण, पाणी आणि पाणी पुनर्भरण पायाभूत सुविधा, सामुदायिक केंद्रे, ज्यात शैक्षणिक पायाभूत सुविधा, आरोग्य आणि पाणी पायाभूत सुविधा आणि ग्रामीण पायाभूत सुविधा सामील आहेत.

### ३. आरोग्य सेवा

- आरोग्य, निक्षय मित्र, वेदांता हॉस्पिटल आणि तत्सम प्रकल्प जेणेकरून फिरती आरोग्य वाहने/ शिबिरे / टेलिमेडिसिन यांच्या माध्यमातून विशिष्ट समुदायांमध्ये आरोग्य सेवा सुधारता येईल. रुग्णालये आणि गुंतवणुकीद्वारे चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांसोबत आरोग्य उपक्रम बांधणे / वाढविणे / समर्थन करणे.
- कुपोषण कमी करण्यासाठी आणि पोषणावर भर देण्यासाठी उपक्रम.
- पौगंडावस्थेतील मुलींची आणि स्त्रियांची मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषण व जनजागृती, अंमलबजावणी आणि मोठ्या प्रमाणात प्रसाराच्या माध्यमातून त्याचा प्रचार करण्यावर लक्ष केंद्रित करणे.

### ४. आपत्ती व्यवस्थापन

- नैसर्गिक आपत्ती निवारण आणि सुरक्षा प्रतिसाद उपक्रम.

### ५. पाणी व स्वच्छता

- स्वच्छता, तमिरा सुरभी आणि तत्सम स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प ज्यात पारंपारिक सामुदायिक पाण्याच्या पायाभूत सुविधांची पुनःस्थापना सामील आहे.

### ६. महिला सबलीकरण

- सखी, शुभलक्ष्मी आणि तत्सम प्रकल्प जेणेकरून ग्रामीण महिलांच्या उपजीविका आणि सामुदायिक कल्याण यांच्याबाबतीत क्षमता वाढविता येईल.

- स्त्रियांच्या नेतृत्वाखाली आणि अंमलबजावणी खाली ग्रामीण व परि-शहरी सूक्ष्म उद्योगांची स्थापना करणे जेणेकरून स्त्रियांची आर्थिक क्षमता वाढविता येईल ज्यात शुभलक्ष्मी को-ऑपरेटिव्ह, प्रकल्प तारा, सखी उत्पादन समिती, जीविका इत्यादी उपक्रम सामील आहेत.

**७. क्रीडा आणि संस्कृती**

- फुटबॉल आणि तिरंदाजीशी संबंधित प्रकल्प, वेदांता फुटबॉल शाळा, तिरंदाजी अकादमी, वेदांता स्पोर्ट्स फाउंडेशन्स आणि तत्सम प्रकल्प.
- समुदायांमध्ये क्लस्टरवर आधारित क्रीडा प्रोत्साहन ज्यात क्षेत्रांमध्ये त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे सामील आहे.
- संस्कृतीला प्रोत्साहन देणे ज्यात आदिवासी व सांस्कृतिक वारशाचे विविध पैलू सामील आहेत.

**८. उपजीविका**

- बारमर उन्नती, साथी प्रगती, समाधान, प्रकल्प हरियाली आणि तत्सम उपक्रम जे ग्रामीण भागात कृषी, पशुधन विकास, जलसंपदा विकास यांच्यावर लक्ष केंद्रित करतात.

**९. कौशल्य विकास**

- कार्य कुशल करणे ज्यात ज्यात कौशल्य वाढविणे आणि कौशल्य पुन्हा देणे सामील आहे जसे की वेदांता स्किल स्कूल, सेसा टेक्निकल स्कूल, झिंक कौशल, युवांसाठी सेसा स्किलिंग मार्केटशी जोडलेले धंदासंबंधी/ तांत्रिक/ व्यावसायिक प्रशिक्षण (व्होकेशनल/टेक्निकल/प्रोफेशनल ट्रेनिंग).

**१०. प्राणी कल्याण**

द ॲनिमल केअर ऑर्गनायझेशन सारखे प्रकल्प आणि सर्व भौगोलिक क्षेत्रातील जैवविविधता, वनस्पती आणि जीव यांच्या कल्याणासाठी तत्सम उपक्रम.